# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः07.09.2026** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

1. 2029 पर्यंत देशाला अमली पदार्थ मुक्त करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्याकडून पथदर्शी आराखडा सादर.
2. एमपीएससी परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा तातडीनं लागू करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही.
3. भरती परीक्षा अधिक पारदर्शक करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना.
4. चायना मास्टर्सच्या पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीला विजेतपद.

**नशामुक्त अशा**

देशाला 2029 पर्यंत अमली पदार्थमुक्त कऱण्यासाठी, तीन वर्षांचा पथदर्शी आराखडा काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गोव्यात जाहीर केला. अमली पदार्थ सेवनाविरूद्ध राष्ट्रीय पातळीवर समन्वित मोहीम राबवण्याचे आवाहन त्यांनी काल वार्ताहर परिषदेत बोलताना केलं. एनसीसी, एनएसएस आणि 'माय भारत' या युवा उपक्रमांच्या माध्यमातून लाखो 'नशामुक्ती मित्र' तयार करण्याचा मानस असून, शिक्षण मंत्रालय आणि युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय तसंच शैक्षणिक संस्थांच्या सहकार्यानं शैक्षणिक परिसर अमली पदार्थमुक्त करण्याचा सरकारचा संकल्प आहे. व्यसनमुक्ती केंद्रांची संख्या तिप्पट करण्यात येणार असून, दहा हजार स्वयंसेवक त्यात सहभागी होणार आहेत. शिवाय पुढील वर्षापर्यंत प्रत्येक राज्यात अमली पदार्थ विरोधी कृती दलाच्या स्थापनेसाठी केंद्राकडून 7 टक्के साहाय्य दिले जाणार असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी आवश्यक कारवाई करण्यात येत आहे. नक्षलवादाप्रमाणेच देशातून अमली पदार्थ सेवनाची समस्याही समूळ नष्ट कऱण्यात येईल, असंही शहा यांनी नमूद केलं.

**फडणवीस-शिष्टमंडळ**

एमपीएससी परीक्षांबाबत प्रश्नपत्रिका निर्मितीपासून, संपूर्ण परीक्षा पद्धतीत आवश्यक त्या सुधारणा तातडीनं लागू कऱण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळानं काल मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. पारदर्शक परीक्षा पद्धती विकसित कऱण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन झाल्याची माहिती फडणवीसांनी दिली. ही समिती राज्यभर सर्व विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि सर्व संबंधितांशी सल्लामसलत करणार आहे. या प्रयत्नांबरोबरच कठोर कायदे सुद्धा करण्यात येतील, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा खेळ करणाऱ्यांवर सरकार कठोर कारवाई करेल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी या शिष्टमंडळाला दिलं.

**भरती परीक्षा समिती**

दरम्यान, राज्य सरकारच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशानं एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही राधा या समितीच्या अध्यक्ष आहेत. पोलिस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह इतर 6 सदस्यांचाही यात समावेश आहे.

**आरोग्य अधिकारी गुणांकन**

राज्यातील जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचं दरवर्षी वस्तूनिष्ठ पद्धतीनं गुणांकन कऱण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागात कामगिरीवर आधारित प्रशासकीय कार्यसंस्कृती रुजवण्याच्या दृष्टीने राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी हा निर्णय घेतला आहे. गेल्या तीन वर्षांच्या कामगिरीवर आधारित ही श्रेणी निश्चित केली जाणार आहे.

**सुप्रिया सुळे**

शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांवर केवळ आंदोलन करून भागणार नाही तर ठोस कृती कार्यक्रम आखून त्याचा पाठपुरावा करावा असं आवाहन महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या अध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी काल नागपूरात केलं. महामंडळाच्या नागपूर आणि अमरावती विभागाच्या संयुक्त अधिवेशनात त्या नागपूरमध्ये बोलत होत्या.

**मेळघाट पेंच**

राज्यातील मेळघाट आणि मध्य प्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्प गिधाडांच्या संवर्धनाच्या दिशेनं देशातील यशस्वी केंद्र ठरली आहेत. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माहितीनुसार, डिसेंबर 2025 ते जानेवारी 2026 या कालावधीत मेळघाट आणि पेंच व्याघ्र प्रकल्पांत 29 गिधाडे सोडण्यात आली. त्यापैकी विविध प्रजातींच्या गिधाडांनी चांगल्या प्रकारे तग धरला असून, त्यांचा जगण्याचा दर 78 टक्क्यांपर्यंत नोंदवला गेला आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***गिधाडांची घटती संख्या पाहता त्यांच्या संवर्धनासाठी सुरू असलेल्या प्रयत्नात मेळघाट आणि पेंचमधील उत्साहवर्धक परिणाम गिधाड संवर्धनाच्या प्रयत्नांना आणि त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मोठी चालना देणारे ठरले आहेत. गिधाडांच्या संवर्धनाला यश मिळणे हे केवळ एका पक्षीप्रजातीच्या संरक्षणापुरते मर्यादित नसून, पर्यावरणीय समतोल राखण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचं आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे.***

**पुरुषोत्तम करंडक**

महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा निकाल काल रात्री पुण्यात जाहीर करण्यात आला. भारती विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ फाइन आर्टस्च्या 'लाजाळू' एकांकिकेनं 61व्या पुरुषोत्तम करंडकावर आपलं नाव कोरलं. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'एरर : ह्युमन डिटेक्टेड' या एकांकिकेने सर्वोकृष्ट प्रायोगिक एकांकिकेसाठीचा

करंडक पटकावला. अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या 'आठवडे बाजार' या एकांकिकेला दुसरं तर मराठवाडा मित्र मंडळाच्या शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाच्या 'स्कीम' या एकांकिकेला तिसरं पारितोषिक मिळालं. हृषीकेश जोशी, रेणुका दफ्तरदार, निपुण धर्माधिकारी यांनी स्पर्धेचं परीक्षण केलं.

**एसटी-जादागाड्या**

गणेशोत्सवासाठी कोकणासह पश्चिम महाराष्ट्रात आपल्या गावी जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास सुखकर आणि आरामदायी व्हावा, यासाठी शिवसेनेच्या वतीनं मोफत बससेवेचा उपक्रम राबविण्यात आला आहे. यासाठी 2 हजार 900 एसटी गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. गणेशभक्तांसाठी मोफत बससेवेच्या तिकीट वितरण सोहळ्यात ते काल ठाण्यात बोलत होते.

**पुणेमोर्चा**

पुण्यात गणेशोत्सवात डीजे बंदीसाठी काल बालगंधर्व मंदिर ते पुणे महापालिका मार्गावर नागरिकांनी उत्स्फूर्त मोर्चा काढला. या मोर्चात तरुणांसह सामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक यांचा सहभाग होता.

**जालना-डीजेनिर्बंध**

जालना जिल्ह्यात गणेशोत्सवादरम्यान विसर्जन मिरवणुकीत डीजेच्या वापरावर पोलिस प्रशासनानं निर्बंध आणले आहेत. पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देऊन गणेशोत्सव साजरा करण्याचं आवाहन जालन्याचे पोलीस अधीक्षक तेगबिर सिंह संधू यांनी केले आहे.

**डीजेमुक्त-रत्नागिरी**

रत्नागिरीत जिल्ह्यात पारंपरिक शिस्तबद्ध गणेशोत्सव साजरा होत असताना डीजेचा वापर न करता राज्यासमोर आदर्श ठेवावा असं आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक नितीन बगाटे यांनी रत्नागिरीवासियांना केलं आहे.

**मारबत महोत्सव-नागपूर**

नागपूरची सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळख असलेल्या मारबत महोत्सवाला कालपासून सुरुवात झाली. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते काळी आणि पिवळी मारबत यांची विधीवत पूजा करून महोत्सवाला सुरुवात झाली. मुख्य सोहळा 11 सप्टेंबर रोजी होईल.

**विशेष रेल्वे**

देवळाली-दानापूर शेतकरी समृद्धी विशेष रेल्वेने शनिवारी शंभरवी फेरी पूर्ण केली. या सेवेमुळे आतापर्यंत 14 हजार टन मालाची वाहतूक करण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते 15 ऑक्टोबर 2024 रोजी या सेवेचा प्रारंभ करण्यात आला होता. या रेल्वेमुळे शेतमालासह विविध प्रकारच्या साहित्याची मोठ्या प्रमाणावर वाहतूक शक्य झाली असून ही सेवा शेतकरी, व्यापारी आणि व्यावसायिकांसाठी महत्त्वाची ठरत आहे.

**शिक्षक पुरस्कार**

राज्य शासनातर्फे दिला जाणारा डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार लातूरच्या डॉ. अंजली जोशी टेंभुर्णीकर यांना शनिवारी पुण्यात प्रदान करण्यात आला. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते टेंभुर्णीकर यांना सन्मानित करण्यात आलं.

**धाराशिव-विकास**

मराठवाड्याच्या विकासासाठी तीन वर्षांपूर्वी 47 हजार कोटी रुपयांच्या विविध पॅकेज आणि विकासकामांना मंजुरी देण्यात आली होती. मात्र मराठवाड्याचे मूलभूत प्रश्न अजूनही कायम आहेत, असा आरोप आमदार कैलास पाटील यांनी काल धारशिव इथं पत्रकार परिषदेत केला. मराठवाड्याच्या मूलभूत प्रश्नांची सरकारला आठवण करून देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष जनआंदोलन हाक दिल्याची माहिती पाटील यांनी दिली.

**मॅरेथॉन**

पंधराव्या सातारा हिल हाफ मॅरेथॉनमध्ये सांगलीच्या प्रवीण कांबळे आणि राणी उत्तंडे यांनी २१ किलोमीटर गटात विजेतेपद पटकावलं. देश-परदेशातील जवळ जवळ दहा हजार धावपटूंनी या स्पर्धेत भाग घेतला.

दरम्यान, मॅरेथॉनमध्ये धावणारे संजय कदम यांचा मृत्यू झाला; शर्यतीच्या परतीच्या मार्गावर असताना ते अचानक कोसळले; त्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

**बॅडमिंटन**

भारतीय बॅडमिंटनपटू सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं काल शेन्झेन इथं झालेल्या चायना मास्टर्सच्या पुरुष दुहेरीच्या पहिल्या वहिल्या विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. भारतीय जोडीनं चीनच्या हे जी टिंग आणि रेन शियांग यू यांचा पराभव केला. या जोडीचे हंगामातलं हे दुसरं विजेतेपद आहे. या जोडीला 2023 आणि 2025 या वर्षांत उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं.

**हवामान**

कोकणात आज बहुतांश ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडयात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**